# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/02/2024 (शनिवार) दुपार

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ७०८५०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
## नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक १७/०२/२०२४ चे ०३.०० वा. ते ०३.३० वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की पवनी येथून नीलज मार्गे टिप्पर ट्रक वाहनामध्ये अवैद्यरीत्या विनापरवाना रेती लोड करून भिवापुर उमरेड मार्गे नागपूर जाणार आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा भिवापूर बस स्टॉप येथे नाकाबंदी करीत असताना एक बारा चक्का टिप्पर MH 40 CM 9762 व त्याच्या मागे दहा चक्का टिप्पर क्र. MH 40 CT 5239 एकामागे एक आढळुन आल्या. स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता दोन्ही वाहनामध्ये अंदाजे १७ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून एक पांढरा व निळया रंगाचा टाटा कंपनीचा टिप्पर ट्रक क्र. MH 40 CM 9762 किंमती ४०,००००० /—रू. मध्ये १० ब्रास रेती किंमती ५०००० /—रू. २) एक पांढरा व नीळसर रंगाचा अशोक लेलॅंड दहा चक्का टिप्पर क्र. MH 40 CT 5239 किंमती ३०,००००० /—रू. मध्ये ०७ ब्रास रेती किंमती ३५००० /—रू. असा एकुण ७०८५००० /—रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) निलेश ईश्वर उइके, या ३६ वर्ष रा. उंदरी सूरगाव उमरेड नागपूर जि. नागपुर २) अभिषेक निरंजन शेंडे, वय ३५ वर्ष रा. आंबेडकर नगर कुंजीलाल पेठ नागपूर** हे पाहीजे आरोपी मालक नामे— **३) संघपाल मेश्राम, रा. ह. मु. बहादुरा दिघोरी नागपूर ४) अरविंद लक्ष्मण फलके, रा. कुही रोड डोंगरगाव** यांचे सांगणे प्रमाणे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. असे एकुण ०४ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे अप क्र. ६५/२०२४ कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

## कोळसा चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या जाळयात

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०४ किमी अंतरावर इंदर कोलस्टोक खदान नं. ६ येथे दिनांक १६/०२/२०२४ चे ७.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– फराज अहमद इस्तेखार अहमद वय २४ वर्ष, रा. WCl सेक्युरीटी गार्ड कामठी ओसीएम कन्हान यांची दि. १५/०२/२०२४ ते १६/०२/२०२४ चे सकाळी ०८.०० वा. पर्यंत पेट्रोलींग डयुटी असताना सकाळी ७.१५ वा. दरम्यान इंदर कोलस्टोक वन एक इसम डेपो मधुन कोळसा बोरी मध्ये भरून मोटर सायकल प्लॅटीना क्र. एम. एच.– ३१ डीआर ४१९० किंमती १५,०००/–रू. ३ बोरी कोळसा अंदाजे २५० कि.ग्रॅ. कि. १५०० रू. असा एकुण १६,५००/– रू. चा मुद्देमाल **आरोपी नामे– संजय हरीचंद बाहे, वय ४६ वर्ष, रा. हवेली** हा बांधुन चोरून घेउन जातांना मिळुन आल्याने आरोपीच्या ताब्यातून असा एकुण १६,५००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सचिन वेळेकर, मो. नं. ८८३००९५३१३ हे करीत आहे. यातील आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोलीस हवालदार सचिन वेळेकर यांनी पार पाडली.

## जबरी चोरी करणारा मुख्य टोळी प्रमुख आरोपी यास नागपूर ग्रामीण पोलींसांनी केले अटक

दिनांक १२.११.२०२३ रोजी फिर्यादी नामे – गोपीचंद्र बनावरीलाल गौतम, वय २८ वर्षे, रा. उमापूर कटला, पोस्ट बवनी हेटार, थाना मांडा, तह. मेज, जि. प्रयागराज (यूपी) यांनी पोलीस स्टेशन ला फिर्याद दिली की, आरोपी नामे क्र. १) करण अर्जुन नाईक, वय २३ वर्षे, २) संतोष राजकुमार रॉय, वय १९ वर्षे, दोन्ही रा. घुग्गूस ता.जि. चंद्रपूर ३) मोहम्मद फिरोज अब्दूल वहाब, वय ४३ वर्षे, रा. चंद्रपूर यांनी ईतर साथीदांरा सोबत मिळून फिर्यादी व त्याचे साथीदारांना सब्बल व टिकास याचा धाक दाखवून त्यांचे मोबाईल जबरने हिसकावून कोहळी रेल्वे लाईन चे सामान ठेवलेल्या ठिकाणावरून १) ६५ स्क्वेअर एम.एम कॉपर कटनरी वायर ३०० मीटर २) एल.एस.डब्ल्यू वायर १६० मीटर ३) सी झपर ८० मीटर ४) जी झपर ९० मीटर ५) कटनरी ६०० ६) कॉक्टंट क्लीप ६०० क्लीप ७) संस्पेशन पंजा ५० नबंर चा ८) ब्रेकेट क्लॅप ३० ९) ५ एम.एम चा ड्रॉफर वायर २ बंडल १०) ७ एम.एम था ड्रॉफर वायर १ बंडल ११) असा अंदाजे ५५,००० रू. चा माल १२) ०७ मोबाईल प्रत्येकी किंमती ७००० रु. प्रमाणे ४९,००० रु. एकूण १०४००० रू चा माल चोरी करून तो टाटा कंपनीचे योद्धा पिकअप चारचाकीत भरून चौरून नेल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्ट वरून पो. ठाणे कळमेश्वर अप. क्र. ९७५/२३ कलम ३९२, ३४ भादवि अन्वये गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

दिनांक १६/०२/२०२४ रोजी सदर गुन्हयातील पाहीजे **आरोपी नामे – नौशाद शहादतुल्ला कुरेशी, वय ३२ वर्षे, रा. वार्ड क्रं. ०२ बैंक ऑफ इंडीयाचे मागे घुग्घूस ता. जि. चंद्रपूर** हा पोलीस ठाणे पाडोली, चंदपूर जिल्हा येथील गुन्हा क्र. ३४/२४ कलम ३, २५ आर्म ॲक्ट सह कलम १३५ महा. पोलीस अधिनियम १९५१ मध्ये जेलबंद आहे. पोउपनि कोलटे सोबत पोना दिनेश गाडगे, पोशि हेमंत बांबूलकर यांना खाजगी वाहणोन चंद्रपूर येथे रवाना करून नमूद आरोस ताब्यात घेवून आमचे समक्ष हजर केल्यावरून आम्ही पोनि योगेश कामाले पो.टे कळमेश्वर नी पो. ठाणे दैनदिन तपशील क्र. ३४/२४ दिनांक १६.०२.२०२४ चे २३.३४ वा. अटक केले. तसेच दिनांक १७.०२.२०२४ रोजी

नमूद आरोपीस पीसीआर घेणेकामी मा. न्यायालय, कळमरेवर येथे हजर केले असता मा. न्यायालयाने दिनांक २२.०२.२०२४ पर्यंत ०६ दिवस पीसीआर घेण्यात आला आहे. नमूद आरोपीस गुन्हयाचे अनुशंगाने विचारपूस सुरू आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन कळमेश्वर येथील ठाणेदार श्री. योगेश कामाले, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कोलटे, पोलीस नायक दिनेश गाडगे, पोलीस अंमलदार हेमंत बांबूलकर, मनिश सोनोने यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**